# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 13/06/2020 (शनिवार)

(सकाळ)

### अवैधरीत्या देशी–विदेशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
### पो. स्टे. सावनेरची कार्यवाही एकुण 11,47,440/–रू. चा मुद्देमाल जप्त

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 12/06/2020 रोजी पो. स्टे. सावनेर मधील पोलीस स्टाफ हे पो. स्टे. सावनेर परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा खापा टि पॉईट अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक होणार आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सावनेर पोलीसांनी 2 ठिकाणी नमुद घटनास्थळी धाडी टाकल्या. पहिल्या प्रकरणात दिनांक 12/6/2020 चे 11:15 वा. ते 12:00 वा. दरम्यान मौजा खापा टि पॉईट रोडवर पो. स्टे. सावनेर स्टाफने नाकाबंदी केली असतांना एमएच– 40/बीजे– 5113 क्रमांकाच्या मारोती सुजुकी बलेनो गाडी येतांना दिसली. सदर वाहनाला थांबवुन तपासले असता वाहनात आरोपी नामे– व्यंकटेश पिट्टया तालपल्लीवार, वय 51 वर्ष, रा. बैल बाजारचे बाजुला, खापा ता. सावनेर याच्या ताब्यातुन गाडीच्या सिट मध्ये जवळ विदेशी दारू अवैधरित्या विना परवाना विक्री करीता वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन खरड्याचे बॉक्स मध्ये ऑफीसर चॉईस कंपनीच्या विदेशी दारुच्या 192 निपा प्रत्येकि 180 एमएल ने भरलेल्या किमंत 34,560/–रु व एक मारुती सुजुकी बलेनो किमंत 8,00,000/–रू. असा एकुण कि. 8,34,560/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी पो. स्टे सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ) ई महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

तसेच दुसऱ्या प्रकरणात दिनांक 12/6/20 चे 16:15 ते 16:40 वा. दरम्यान मुखबीरच्या खबरे वरुन पो. स्टे. सावनेर स्टॉफ ने मौजा मुरलीधर मंदीर जवळ, सावनेर येथे नाकाबंदी केली असता एमएच– 31/झेड– 8908 क्रमांकाची सेंट्रो कार येतांनी दिसली. सदर वाहनास थांबवुन तपासले असता वाहनात चालक आरोपी नामे– अनंता बोरीकर, रा. पारडसिंगा (मध्यप्रदेश) याच्या ताब्यातुन अवैधरित्या एका खरड्याच्या खोक्यात चादरीने झाकुन 48 निपा देशी दारु संत्रा भिंगरी प्रत्येकी 180 एमएल भरलेल्या किमंत 2,880/–रु. चा माल वाहानामध्ये घेवुन जातांना मिळुन आला आहे. अशा अवैधरित्या वाहतुक करीत असता एकुण 3,12,880/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा नाररायन बोरकर पो.स्टे सावनेर यांच्या रिपोर्ट वरून पो. स्टे सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ) ई महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा

नोंद करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. दोन्ही प्रकरणात 8640 मिली देशी दारू, 34560 मिली विदेशी दारूसह व 2 कार असा एकुण कि. 11,47,440/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अशोक सरबंळकर सावनेर विभाग सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. सावनेरचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. अशोक कोळी, पोलीस हवा सुनिल व्यवहारे, नारायण बोरकर व इतर पोलीस स्टाफ यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर